शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून राज्यातील विद्यमान खाजगी संस्थेत सध्या सुरु असलेल्या अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ, तसेच अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम बंद करणे इत्यादी बाबत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने शासन मान्यता देणेबाबत...

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्र.मान्यता-२०१९/(प्र.क्र.१०१/१९)तांशि-५
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२.
दिनांक: २५ जून, २०१९.

संदर्भ : १) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दि. १५/०५/१९ रोजी ई-मेल व्दारे उपलब्ध करुन दिलेली मान्यतेची यादी.
२) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक १०/एनजीपी/प्रवेशक्षमता वाढ-घट/मान्यता/२०१९/५७४, दि.३०.०५.२०१९.

प्रस्तावना :-

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडून शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून राज्यातील विद्यमान खाजगी संस्थेत सध्या सुरु असलेल्या पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ, विद्यमान पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम बंद करणे इत्यादी बाबत संस्थांना मान्यता देण्यासंदर्भात अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचा दिनांक १५.०५.२०१९ रोजीचे ई-मेलचे अनुषंगाने संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी संदर्भीय पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर केलेला आहे. सोबत जोडलेल्या Annexure-A व Annexure B मध्ये नमुद संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ तसेच अभ्यासक्रम बंद करणे इत्यादी बाबत शासन मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन सोबत जोडलेल्या Annexure- A व Annexure- B मध्ये नमूद संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ तसेच अभ्यासक्रम बंद करणे इत्यादीबाबत शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१. प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील. सदर अभ्यासक्रमासाठी संस्थेची प्रवेश क्षमता विवरणपत्रातील त्यांच्या नावासमोर नमूद केल्याप्रमाणे मर्यादित राहील.

२. शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

३. संबंधित संस्थेने संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे आवश्यक ते प्रक्रिया शुल्क व संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

४. सदर व्यावसायीक पदविका अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमांच्या प्रवेश नियमानुसार /पद्धतीनुसार करण्यात येतील.

५. महाराष्ट्र राज्यातील विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाचे व शुल्काचे विनियमन करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ व त्याच्याअनुषंगाने वेळोवेळी निर्गमित होणारे नियम तथा आदेश संबंधित संस्थांना लागु राहतील.

६. शुल्क नियामक प्राधिकरणाने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ अनुसार कारवाई करण्यात येईल.

७. संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी शासन नियमाप्रमाणे नियुक्त करावेत. त्यांना नियमानुसार वेतन व भत्ते देण्यात यावेत. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

८. संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा

पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकाप्रमाणे सर्व शैक्षणिक सोयीसुविधा (उदा. प्रयोगशाळा, वाचनालय, वर्गखोल्या इ.) करणे आवश्यक आहे.

९. सदर संस्था, संचालक, तंत्रशिक्षण यांच्या नियंत्रणाखाली राहिल व संबंधित अभ्यासक्रमांच्या परीक्षा महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, वांद्रे, मुंबई यांच्याकडून घेतल्या जातील.

१०.या संस्थेतील बंद करावयाच्या अभ्यासक्रमांच्या संबंधित सर्व दस्तऐवज जसे की गुणपत्रिका, उत्तरपत्रिका, निकालपत्रे, विद्यार्थ्यांचे पत्ते, फीच्या पावत्या इत्यादी बाबी संस्थेने मंडळाकडे सूपूर्द करणे आवश्यक राहील.

११.संबंधीत अभ्यासक्रमासाठी नियुक्त शिक्षक वर्ग/कर्मचारी यांच्या सेवाविषयक व इतर बाबतीत न्यायप्रविष्ठ असलेली सर्व प्रकरणांची जबाबदारी संस्था प्रमुखांची राहील. भविष्यकाळात कोणतेही न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास त्यास सर्वस्वी संस्था जबाबदार राहील.

१२.संस्थेकडून शासनाची वसुली अद्यापी थकबाकी असल्यास त्याचा भरणा करणे संस्था प्रमुखांवर बंधनकारक राहील.

१३.संस्थेमध्ये सदर अभ्यासक्रम राबविण्यासाठी आवश्यक स्थावर जंगम मालमत्तेविषयी या संस्थेने शासनाकडून किंवा कोणत्याही वित्तीय संस्थेकडून कर्ज घेतलेले असल्याचे यापुढे निदर्शनास आल्यास त्याची परतफेड करण्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेची राहील.

१४.संस्थेतील संबंधित अभ्यासक्रम बंद केल्यानंतर त्या संस्थेतील प्रवेशित विद्यार्थ्यांना व माजी विद्यार्थ्यांना परिक्षेस बसण्याची इच्छा असल्यास त्याची पर्यायी व्यवस्था करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

१५.रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक राहील.

१६. अभ्यासक्रम बंद झाल्यामुळे भविष्यात जी काही परिस्थिती उद्भवते त्यास संबंधित संस्था जबाबदार राहतील. याप्रमाणे तसे हमीपत्र संबंधित संस्थांनी द्यावयाचे आहे.

१७.याशिवाय संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

१८. ज्या संस्थांनी संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे प्रोसेसिंग फी अदा केलेली नाही, त्या संस्थांकडून संचालकांनी अंतीम मान्यता देण्यापूर्वी ती वसूल करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०६२५११२४५६९३०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Anil Raghunath Katkar

Digitally signed by Anil Raghunath Katkar
DN: CN = Anil Raghunath Katkar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Higher and Technical Education Department
Date: 2019.06.25 11:37:31 +05'30'

(अ.र.काटकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई
३. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे/नाशिक (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत),
४. संबंधित विद्यापीठांचे कुलसचिव, (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
५. सर्व संबंधित संस्था (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
६. अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली - ११० ००१.
७. सहायक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण भाग), नवी दिल्ली.
८. विभागीय अधिकारी, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, २ रा मजला, चर्चगेट, मुंबई
९. निवड नस्ती/तांशि-५.

शासन निर्णय क्र.मान्यता-2019(प्र.क्र.101/19)/तांशि-5, दि. 25 जून, 2019 सोबतचे

Annexure A

List of Diploma Engineering Courses for Extention of Approval with Increase in Intake [Approved by AICTE A.Y. 2019-20]

Sr No	Current Application Number	DTE Code	Institute Name	Institute Address	District	Institution Type	Name of Parent Organisation (Trust)	Organisation(Trust) Address	Program	University/ Board	Level	Name of Course	Shift	Full Time/ Part Time	Intake Approved for 2018-19	Intake Approved for 2019-20
1	1-4266715166	5222	SANJIVANI K.B.P.POLYTECHNIC,KOPARGAON	AT-SAHAJANANDNAGAR POST.SHINGANAPUR TAL.KOPARGAON DIST.AHMEDNAGAR	AHMEDNAGAR	Unaided - Private	SANJIVANI RURAL EDUCATION SOCIETY,KOPARGAON	AT.SAHAJANANDNAGAR POST.SHINGANAPUR TAL.KOPARGAON DIST.AHMEDNAGAR	ENGINEERING AND TECHNOLOGY	Maharashtra State Board of Technical Education, Mumbai	DIPLOMA	COMPUTER TECHNOLOGY	1st Shift	FULL TIME	120	180
2	1-4259485303	5244	MET'S INSTITUTE OF TECHNOLOGY-POLYTECHNIC	BHUJBAL KNOWLEDGE CITY GAT NO.1071 ADGAON	NASHIK	Unaided - Private	MUMBAI EDUCATIONAL TRUST	MUMBAI EDUCATIONAL TRUST, GEN A.K. VAIDYA CHOWK, BANDRA(W),	ENGINEERING AND TECHNOLOGY	Maharashtra State Board of Technical Education, Mumbai	DIPLOMA	CIVIL ENGINEERING	1st Shift	FULL TIME	60	120

शासन निर्णय क्र.मान्यता-2019(प्र.क्र.101/19)/तांशि-5, दि. 25 जून, 2019 सोबतचे

Annexure B

List of Diploma Engineering Closure of Course [Approved by AICTE A.Y. 2019-20]

Sr No	Current Application Number	DTE Code	Institute Name	Institute Address	District	Institution Type	Name of Parent Organisation (Trust)	Organisation(Trust) Address	Program	University/ Board	Level	Name of Course	Shift	Full Time/ Part Time	Intake Approved for 2018-19	Intake Approved for 2019-20
1	1-4259485303	5244	MET'S INSTITUTE OF TECHNOLOGY-POLYTECHNIC	BHUJBAL KNOWLEDGE CITY GAT NO.1071 ADGAON	NASHIK	Unaided - Private	MUMBAI EDUCATIONAL TRUST	MUMBAI EDUCATIONAL TRUST, GEN A.K. VAIDYA CHOWK, BANDRA(W),	ENGINEERING AND TECHNOLOGY	Maharashtra State Board of Technical Education, Mumbai	DIPLOMA	CIVIL ENGINEERING	2nd Shift	FULL TIME	60	0